नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १८/०६/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील मौजा दातेवाडी येथे दिनांक १५/०६/२०२२ चे १८:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– भाऊराव व्यकटी गायकवाड वय ७० वर्ष रा.दातेवाडी त.नरखेड यांच्या मुलीने एक वर्षा पुर्वी सुनिल सरदार याचे सोबत प्रेमविवाह केले. फिर्यादी याने मुलीचे नावाने एल.आय.सि.चे पैसे भरलेले ते मुलीने काढले. फिर्यादी यांनी मुलीला 'पैसे मी भरले तु कसे काढले' असे म्हटले असता फिर्यादीने म्हटले मी काढले व फिर्यादीस पैसे दिले नाही. तेव्हा यातील आरोपी क्र. १) किशोर ढोणे, २) कांता सरदार, ३) महादेव सरदार, ४) विकास घरडे, ५) माधुरी घरडे, ६) दिया घरडे, ७) सुनिल सरदार, ८) राजेश्वरी सरदार ९) गंगा ढोणे, १०) नितेश ढोणे, ११) अशोक वानखेडे यांनी गैरकायद्याची मंडळी तयार करून सार्वजनिक ठिकाणी फिर्यादीस अश्लिल भाषेमध्ये शिवीगाळ करून पेटवुन देवुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३,२९४,५०४,५०६ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री पुरूषोत्तम धोंडे हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा तिश्टी बु शिवार येथे दिनांक १२/०६/२०२२ चे ०६.३० वा. ते १२/०६/२०२२ चे ०६/३० वा ते १६/०६/२०२२ चे १८.०० वा दरम्यान **yornurav 270** या इंस्टाग्राम आयडी वापरकता आरोपीने फिर्यादीचे नावाने असलेल्या इंस्टाग्राम आयडी वर तिचा व तिच्या मैत्रिणीचा चेहरा असलेले अश्लिल फोटो पाठवुन तसेच गावातील इतर काही मुलींना अश्लिल मेसेज पाठवुन व्हिडीओ कॉल केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ६७, ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोजिस निरीक्षक श्री आत्राम मो.क्र. 9405194317 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर